ePaper

## पुढील आठवडा पावसाचा असणार, आयएमडीकडून अॅलर्ट जारी



वर्ष - 7 । अंक -57 | UDYAM-MH-26-0158827

# महाईन्यूज ™

लढाई सत्याची... लोकशाहीच्या हक्काची!

www.mahaenews.com | शनिवार, दिनांक 24 जून 2023 | पिंपरी-चिंचवड आवृत्ती | mahaenews.com | maha_enews | Mahaenews

**आतील पानांत**

- करोडो रुपये पाण्यात!
- होर्डिंग चालक तुपाशी, ग्रामपंचायत उपाशी!

# शिवसेनेच्या पिंपरी विधानसभेसाठी भाजपची जोरदार तयारी!

## 2024 ला पिंपरीत शिवसेनेचा आयात उमेदवार असणार?

।पिंपरी। महाईन्यूज । प्रतिनिधी।

**जागावाटपात शिवसेनेकडे असलेल्या मावळ आणि शिरूर लोकसभा या मतदारसंघात भाजपने जोरदार तयारी सुरु करून तेथील शिवसेना (शिंदे) इच्छुकांचे 'टेन्शन' तूर्तास वाढवले आहे. तशीच जय्यत तयारी भाजपने विधानसभेलाही सुरु केली आहे. यामुळे शिवसेनेच्या पिंपरी विधानसभेतील शिवसेना इच्छुकांचेही 'ब्लड प्रेशर' वाढले आहे.**




पिंपरी-चिंचवडमधील तीनपैकी भोसरी आणि चिंचवड या दोन विधानसभा मतदारसंघात भाजपचे आमदार अनुक्रमे महेश लांडगे आणि अश्विनी जगताप आहेत. तर, पिंपरीत राष्ट्रवादी काँग्रेसचे अण्णा बनसोडे आमदार आहेत. मात्र, येत्या विधानसभेला २०२४ ला पिंपरीत युतीचा आमदार करून शहरात शत-प्रतिशत भाजप करण्याचा निश्चय पक्षाच्या पिंपरीतील पदाधिकाऱ्यांनी केला. पिंपरीत मोदी @ ९ मोहिमेतील 'घर चलो अभियानाच्या पत्रकापरिषदेत भाजपने विधानसभेबद्दल आपला मनोदय व्यक्त केला. युतीच्या जागावाटपात पिंपरीची जागा शिवसेनेकडे आहे. २०१४ ला तेथून शिवसेनेचे अॅड. गौतम चाबूकस्वार विजयी झाले होते. तर, गतवेळी २०१९ ला त्यांचा पराभव झाला होता. त्यामुळे या जागेवर शिवसेनेचा दावा आहे. मात्र, यावेळी शिंदे शिवसेनेकडे तुल्यबळ इच्छूक उमेदवार नाही. परिणामी ते तगडा उमेदवार आयात करण्याची चर्चा आहे.

### भाजपकडे पिंपरीत तुल्यबळ उमेदवार

शिंदे शिवसेनेचे प्रमुख आणि मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी नुकतीच पिंपरी-चिंचवड दौऱ्यात राष्ट्रवादीचे पिंपरीचे आमदार बनसोडे यांची कार्यालयात जाऊन भेट घेतली आहे. त्यामुळे पिंपरीतील शिवसेनेच्या जागेबाबत चर्चेला आणखी बळ मिळाले आहे. दुसरीकडे भाजपकडे पिंपरीत एकापेक्षा अधिक तुल्यबळ उमेदवार आहेत. त्यामुळे त्यांचीही येथे जोरदार तयारी सुरु आहे.

# मावळातील पाणीपुरवठा योजनेच्या कामाला गती द्या

## पावसाळापूर्व कामे पूर्ण करा; शिवसेना खासदार श्रीरंग बारणे यांच्या सूचना

। पिंपरी । महाईन्यूज । प्रतिनिधी।

**मावळ तालुक्यात जलजीवन मिशनअंतर्गत सुरु असलेल्या कामांना गती द्यावी. कामाचा दर्जा चांगला ठेवावा. चुकीचे काम करणा-यांची गय केली जाणार नाही असा इशारा देतानाच पावसाळ्यापूर्वी तालुक्यातील सर्व गावांमधील खड्डे बुजावेवत अशा सूचना मावळचे शिवसेना खासदार श्रीरंग बारणे यांनी दिल्या आहेत**



विकास कामे, पावसाळापूर्व कामांसंदर्भात खासदार बारणे यांनी आढावा बैठक घेतली. पंचायत समितीच्या कार्यालयात झालेल्या बैठकीला तहसीलदार विक्रम देशमुख,गट विकास अधिकारी सुधिर भागवत, शिवसेनेचे उपजिल्हाप्रमुख शरद हुलावळे, तालुका प्रमुख राजेश खांडभोर, विशाल हुलावळे, दत्ता केदारी, धनंजय नवघने, मुन्ना मोरे, प्रवीण ढोरे उपस्थित होते.

खासदार बारणे म्हणाले, जलजीवन मिशनअंतर्गत ११४ गावांमध्ये पाणीपुरवठा योजनेची कामे चालू आहेत. या योजनेत ५० टक्के केंद्र तर ५० टक्के राज्य सरकारचा सहभाग आहे. या कामाच्या दर्जाबाबत काही सरपंचांनी तक्रारी केल्या आहेत. कोणी चुकीचे काम करत असेल. तर, त्याची गय केली जाणार नाही. या संपूर्ण कामाचा आढावा घेण्यासाठी पाणीपुरवठा मंत्री गुलाबराव पाटील यांच्यासोबत बैठक घेतली जाईल. चुकीच्या काम करणा-या ठेकेदारांवर कारवाई केली जाईल.

पावसाळ्यापूर्वी तालुक्यातील सर्व गावांमधील रस्त्यांवरील खड्डे बुजवावेत. पावसाळ्यात लाईट जाणार नाही याची विद्युत विभागाने काळजी घ्यावी. तारांवर आलेल्या फांद्या काढाव्यात. जीर्ण झालेले पोल बदलावेत. पुणे जिल्हा नियोजन मंडळातून मंजुर झालेले ट्रान्सफॉर्मर तत्काळ बसवून घ्यावेत.

# करोडो रुपये पाण्यात!

## » पुणेकरांना समान पाणी देण्यासाठी सल्ल्यांवर सल्ले!

### » समान पाणीपुरवठा योजनेचे काम सुरू असतानाच महापालिका हद्दीत 11 गावांचा समावेश



। पुणे । महाईन्यूज । प्रतिनिधी।

**समान पाणीपुरवठा योजनेचे काम सुरू असतानाच महापालिका हद्दीत ११ गावांचा समावेश करण्यात आला. त्यामुळे या गावांमध्ये समान पाणीपुरवठा योजना राबविण्याचा निर्णय घेत सल्लागाराची नियुक्ती करण्यात आली. समाविष्ट ११ गावांचा सविस्तर प्रकल्प आराखडाच कसाबसा झाला आहे. त्यामुळे समान पाणीपुरवठा योजना गावांपासून लांबच राहिली असून, योजनेला गती देण्यासाठी पुन्हा सल्लागाराची नियुक्ती करण्यात आली आहे. विशेष म्हणजे समाविष्ट गावांत समान पाणीपुरवठा योजना नसतानाही गावांचा समावेश झाल्यापासून पंधरा टक्के वाढीव दराने पाणीपट्टी आकारली जात आहे. त्यामुळे समान पाणीपुरवठा योजनेतील असमानताही स्पष्ट झाली आहे.**

महापालिका हद्दीत ऑक्टोबर २०१७ मध्ये ११ आणि त्यानंतर जून २०२१ मध्ये २३ अशा एकूण ३४ गावांचा समावेश महापालिका हद्दीत करण्यात आला. यामुळे शहराचे भौगोलिक क्षेत्रही वाढले असून लोकसंख्याही ५० लाखांच्या घरात पोहोचली आहे. पिण्याचे पाणी, सांडपाणी आणि रस्ते यांसारख्या पायाभूत सुविधा पुरविण्यात महापालिकेला अपयश आले असून, पिण्यासाठी बहुतांश गावांना टँकरवर अवलंबून राहावे लागत असल्याची वस्तुस्थिती आहे.

या गावातील पाणी समस्या दूर करण्यासाठी महापालिकेने गावांचा समावेश महत्त्वाकांक्षी समान पाणीपुरवठा योजनेमध्ये करण्याचा निर्णय घेतला. त्यासाठी गेल्या वर्षी महापालिका प्रशासनाकडून प्रकल्पाची रचना, अंमलबजावणी आणि देखभाल-दुरुस्तीसाठी मध्य प्रदेशातील एका कंपनीला काम दिले. त्यासाठी एक हजार ३०० कोटींच्या खर्चाला मंजुरी देण्यात आली. या कंपनीबरोबर करार करताना अंमलबजावणीच्या टप्प्यासाठी चार वर्षांचा कालावधी समाविष्ट करण्यात आला होता. त्यानंतर पुढील पाच वर्षे देखभाल आणि दुरुस्तीसाठी निश्चित करण्यात आली होती. मात्र या कंत्राटदाराने बावधन, सूस, म्हाळुंगे, लोहगाव आणि वाघोली या गावांचा सविस्तर प्रकल्प अहवाल तयार केला आहे. त्यामुळे या योजनेच्या कंत्राटदाराला काळ्या यादीत टाकण्यात आले असून, नव्याने ही प्रक्रिया राबविण्यात येणार आहे. त्यासाठी पुन्हा निविदाप्रक्रिया राबविण्यात येणार असून, महापालिकेच्या पूर्वगणन समितीनेही त्याला मंजुरी दिली आहे. त्यामुळे योजनेवर उधळपट्टी होणार असल्याचेही स्पष्ट झाले असून समान पाणीपुरवठ्यासाठी गावांना काही वर्षांची प्रतीक्षा करावी लागणार आहे.

### टँकरद्वारे पाणीपुरवठा

**» शहराची पुढील तीस वर्षांची लोकसंख्या लक्षात घेऊन समान पाणीपुरवठा योजनेची कामे हाती घेण्यात आली आहेत. त्यासाठी पुढील तीस वर्षे दर वर्षी पाणीपट्टीत किमान पंधरा टक्क्यांनी वाढ होणार आहे. तीस वर्षांच्या योजनेत समाविष्ट ३४ गावांच्या पिण्याच्या पाण्याची मागणी पूर्ण करण्यासाठी महापालिकेला दहा हजार दशलक्ष प्रतिघनफूट पाण्याची आवश्यकता आहे. त्यासाठी महापालिकेने मुळशी धरणातून पाणी घेण्याची योजना हाती घेतली आहे. मात्र सध्या या गावांना महापालिकेला मंजूर झालेल्या पाणी कोट्यातून पाणी द्यावे लागत असून, गावांची तहान भागविण्यासाठी टँकरद्वारे पाणीपुरवठा करावा लागत आहे.**

---

# अरविंद केजरीवाल आणि उद्धव ठाकरे यांची अस्तित्व टिकवण्यासाठी शेवटची लढाई!

## » चंद्रशेखर बावनकुळे: मोदीजींच्या 9 वर्षाच्या कामाची आमच्याकडे शिदोरी

। पुणे । महाईन्यूज । प्रतिनिधी।

**चाराज्य लोकसेवा आयोगाच्या (एमपीएससी) परीक्षेत राज्यात तिसऱ्या क्रमांकाने उत्तीर्ण झालेल्या दर्शना पवार हिची हत्या तिचा मित्र सुधीर ऊर्फ राहुल दत्तात्रय हंडोरे यानेच केल्याचे पोलीस तपासात निष्पन्न झाले आहे. पुणे ग्रामीण पोलिसांनी राहुलला मुंबईतील अंधेरी रेल्वे स्थानकातून बुधवारी रात्री ताब्यात घेतले. लग्नाला नकार दिल्याने दर्शनाची हत्या केल्याची कबुली राहुलने दिली आहे.**

आता अरविंद केजरीवाल आणि उद्धव ठाकरे  हे दोन चेहरे वाढले आहेत. असे कितीही चेहरे उभे राहिले, तरी २०१९ मध्ये मोदींच्या मागे देश उभा राहिला. यापुढेही भारताची जनता मोदींच्या मागे उभी राहील. हे सगळे आता आपल्या अस्तित्वाची शेवटची लढाई लढत आहेत, असे मत भारतीय जनता पार्टीचे महाराष्ट्र प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे यांनी व्यक्त केले.

कसबा मतदारसंघांमध्ये कसबा निवडणूक प्रमुख हेमंत रासने यांच्या पुढाकाराने आयोजित 'घर चलो अभियानाचा' शुभारंभ तुळशीबागेमधून झाला. यावेळी हेमंत रासने यांच्यासह कसबा मतदारसंघातील माजी नगरसेवक व भाजप पदाधिकारी उपस्थित होते.

"दर्शनाचा मृतदेह सापडताच आरोपी राहुल आधी पुण्यातून सांगलीत मग..."; पोलिसांनी सांगितली देशभरातील 'या' ठिकाणांची माहिती

यावेळी चंद्रशेखर बावनकुळे म्हणाले की, उद्धव ठाकरे यांना आदित्य ठाकरे यांच्या भविष्याची चिंता आहे. सोनिया गांधींना राहुल गांधींची चिंता आहे. शरद पवार साहेबांना सुप्रिया सुळे यांची चिंता आहे. सन २०२४ मध्ये



नरेंद्र मोदी यांची सत्ता आल्यानंतर आपले अस्तित्व राहणार नाही. आपण जे काय काळे व्यवहार केले आहेत ते जनतेसमोर आल्याशिवाय राहणार नाहीत, ही त्यांच्यामध्ये भीती असल्याचे त्यांनी सांगितले. तसेच ते पुढे म्हणाले की, नरेंद्र मोदींनी ९ वर्षात केलेले जे काम आहे. ते काम घर 'चलो अभियानाच्या माध्यमातून घरा-घरापर्यंत पोहोचवले जात आहे. कसबा विधानसभा मतदारसंघात ६० हजार घरी जाण्याचा निर्णय घेतला आहे. मोदीजींच्या ९ वर्षाच्या कार्यकाळाची आणि  देवेंद्र फडणवीस यांनी पाच वर्षात मुख्यमंत्री म्हणून केलेले काम, याची शिदोरी आमच्याकडे आहे. त्यामुळे आम्ही बिनधास्तपणे जनतेत जातो. आनंदाने मोदींचे हे पत्र जनता स्वीकारत आहे. पुन्हा एकदा २०२४ मध्ये मोदी पंतप्रधान होतील, असा विश्वास देखील त्यांनी यावेळी व्यक्त केला.

# नियती निष्ठूर झाली! शेतातून परतताना ट्रॅक्टर खड्डयात पलटी, शेतकऱ्याचा चिरडून अंत

।पुणे। महाईन्यूज ।

ट्रॅक्टरवरील ताबा सुटल्याने खोल खड्डयात पलटी होऊन त्याखाली अडकलेल्या शेतकऱ्याचा जागीच मृत्यू झाला. पुणे जिल्ह्यात आंबेगाव तालुक्यातील वळती गावाच्या हद्दीत काटवान वस्ती परिसरात ही दुर्दैवी घटना घडल्याचे समोर आले आहे. गुरुवार २२ जून रोजी सायंकाळी साडेसात वाजण्याच्या सुमारास हा प्रकार घडला. या घटनेने परिसरात सर्वत्र एकच हळहळ व्यक्त केली जात आहे.

संतोष गेणभाऊ जुंदरे (वय ४८ वर्ष) असे या अपघातात मृत्युमुखी पडलेल्या शेतकऱ्याचे नाव आहे. या घटनेने जुंदरे कुटुंबासह परिसरावर शोककळा पसरली आहे.

याबाबत अधिक माहिती अशी की, संतोष गेणभाऊ जुंदरे हे स्वतःच्या मालकीचा ट्रॅक्टर घेऊन गुरुवारी सायंकाळी साडेसात वाजण्याच्या सुमारास काटवान वस्तीतून कालव्याच्या रस्त्याने घरी चालले होते. अचानक त्यांचा ट्रॅक्टरवरील ताबा सुटला आणि रस्त्याच्या पश्चिमेला असलेल्या मोठ्या





खड्डयात त्यांचा ट्रॅक्टर पलटी झाला.

संतोष जुंदरे हे ट्रॅक्टरखाली सापडल्याने त्यांचा जागेवरच मृत्यू झाला. त्यावेळी पाठीमागून जात असताना शेतकरी शिवाजी किसन लोखंडे यांनी हे पहिले. त्यांनी तातडीने स्थानिक शेतकऱ्यांना तेथे बोलावून घेतले. जुंदरे यांना ट्रॅक्टरच्या खालून काढण्याचा प्रयत्न करण्यात आला, परंतु तोपर्यंत संतोष यांचा मृत्यू झाला होता.

यावेळी वळती गावचे पोलीस पाटील प्रकाश लोंढे यांना घटनेची खबर देण्यात आली. त्यानंतर मंचर पोलीस ठाण्याचे पोलिस नाईक शेखर भोईर, पोलिस कॉन्स्टेबल अविनाश दळवी, पोलिस पाटील प्रकाश लोंढे यांनी घटनास्थळी जाऊन पंचनामा केला. मृत संतोष जुंदरे यांच्या पश्चात पत्नी, एक मुलगा, मुलगी असा परिवार आहे.

# होर्डिंग चालक तुपाशी, ग्रामपंचायत उपाशी!

## हिंजवडी परिसरातील स्थिती, सर्व नियमही गुंडाळले बासनात

। पिंपरी-चिंचवड ।
महाईन्यूज । प्रतिनिधी।

**महापालिका हद्दीत होर्डिंगबाबत नियमावली असल्याने काही प्रमाणात का होईना संबंधित विभागाचे यावर नियंत्रण असते. मात्र, पिंपरी-चिंचवड महापालिका हद्दीलगतच्या ग्रामीण भागात याबाबत सर्वच आनंदीआनंद आहे. आयटीनगरी हिंजवडी पट्ट्यात कोणतीच नियमावली अस्तित्वात नसल्याने अनधिकृत होर्डिंग मालक फुकटात मालामाल होत आहेत. त्यामुळे 'होर्डिंग मालक तुपाशी, ग्रामपंचायत उपाशी' अशी गत झाली आहे.**



सर्वसाधरणपणे ४० बाय ४० चौरस फूट बॅक टू बॅक साईझचा युनिपोल करायला सुमारे सात ते आठ लाख रुपये खर्च येतो. त्यासाठी जागा मालक वर्षाला दीड ते दोन लाख रुपये भाडे घेतो. तेही शंभर टक्के ॲडव्हान्समध्ये डिपॉझिट ही प्रथा होर्डिंग व्यवसायात नसल्याने आगाऊ रक्कम घेण्याची प्रथा आहे. या होर्डिंगमागे प्रति महिना एक ते दीड लाख रुपये जाहिरातींचे उत्पन्न मिळते. वर्षाकाठी पंधरा लाखांची उलाढाल होते. पहिल्याच वर्षी चार ते पाच लाख व दुसऱ्या वर्षी सुमारे ८० टक्के म्हणजेच दहा लाख रुपये नफा होतो.

एवढी सगळी उलाढाल होत असताना स्थानिक ग्रामपंचायतींना मात्र छदामही मिळत नाही. एकीकडे महापालिकेला ६५ रुपये प्रति चौरस फूटप्रमाणे होर्डिंगधारक कर भरत असताना वाकड-हिंजवडी रस्त्यावरील मधूबन हॉटेल सोडताच ही फुकटच्या महाकाय होर्डिंगची शर्यत पाहायला मिळते. आयटी पंचक्रोशीत एकशे बढकर एक महाकाय होर्डिंगने रस्ते व्यापले आहेत. हे बहुतेक होर्डिंग राजकारणी, पुढारी, स्थानिक नेते मंडळी यांची आहेत. माण, मारुंजी, नेरे, जांबे, कासरसाई गावातील रस्ते, चांदे-नांदे, हिंजवडी-वाकड रस्ता, हिंजवडी माण रस्ता दुतर्फा होर्डिंगने व्यापले आहेत, ही बाब आयटीच्या विद्रुपीकरणाला कारणीभूत ठरत आहे. त्याचबरोबर मोठ्या अपघातालाही निमंत्रण देत आहेत. होर्डिंग मालक वर्षाकाठी लाखो रुपयांचा नफा कमवत असताना 'पीएमआरडीए', स्थानिक ग्रामपंचायत प्रशासन मात्र, नामानिराळे आहेत. त्यांना एक रुपयाचादेखील कर मिळत नाही. गिरीश बापट पालकमंत्री असताना होर्डिंगची नोंद पीएमआरडीए प्रशासनाकडे व्हावी, यासाठी एक नियमावली तयार केली होती. मात्र, कालांतराने हा विषय मागे पडला. त्यानंतर तत्कालीन पालकमंत्री अजित पवार व विद्यमान मंत्री चंद्रकांत पाटील यांच्याकडून पाठपुरावा व हालचाली होऊ शकल्या नाहीत.

### आयटीनगरी हिंजवडी पट्ट्यात कोणतीच नियमावली अस्तित्वात नाही

### एक होर्डिंग म्हणजे आठ मजली इमारतच

**महाराष्ट्र शासनाच्या आकाश चिन्ह विभागाच्या निर्णयानुसार २० बाय २०, ३० बाय २०, ३० बाय ३०, ४०बाय २० फूट साईझ अशी जाहिरात फलक आकाराची प्रमाणित म्हणजेच नऊशे स्केअर फुटांपेक्षा जास्त नसावी, असा नियम आहे. जमिनीपासून २० ते २५ फूट युनिपोलची उंची असावी व त्यावर सांगाडा, अशी उंची निश्चित आहे. ते उभारताना वृक्षतोड होऊ नये, असाही नियम आहे. मात्र, हिंजवडी परिसरात ८० बाय ४० फुटांचे नियमापेक्षा तिप्पट मोठे महाकाय म्हणजेच जणू आठ मजली इमारतीएवढे दोन होर्डिंग आहेत. किवळे दुर्घटनेनंतर महापालिका हद्दीत होर्डिंगचा आकार कमी झाला. मात्र, हिंजवडी परिसरात नियमावलींची पायमल्ली करत, सुरक्षिततेलादेखील वाऱ्यावर सोडले आहे.**

# देशातील पहिली एकात्मिक वंध्यत्व निवारण कार्यशाळा उत्साहात

## प्रीशा फर्टिलीटी सेंटर, महाराष्ट्र आयुर्वेद संमेलन, वात्सल्य हॉस्पिटल यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजन

। पिंपरी-चिंचवड । महाईन्यूज । प्रतिनिधी।

**बोवंध्यत्व ही आजची ज्वलंत समस्या आहे. आजच्या धकाधकीच्या जीवनशैलीमुळे अकाली वंध्यत्व ही समस्या स्त्री, पुरुषांमध्ये अचानकपणे अतिशय वेगाने वाढणारी व जटील समस्या आहे. यातून होणारे शारीरिक व मानसिक नुकसान टाळता यावे व अपेक्षीत असणारी गर्भधारणा लवकरात लवकर कमी खर्चात, कमी त्रासाने निसर्ग नियमानुसार व्हावी, यासाठी एकात्मिक (पारंपरिक आयुर्वेद आधुनिक ॲलोपॅथी) एकत्र आणून ही कार्यशाळा उत्साहात पार पडली. अशा प्रकारची कार्यशाळा आयोजनाचा जगातील हा पहिलाच प्रयोग असावा. ही संकल्पना वंध्यत्व निवारण तज्ज्ञ डॉ. जीवन चौधरी यांनी सर्वप्रथम मांडली. तसेच तज्ज्ञ सहकारी सोबत घेऊन ही कार्यशाळा राबविण्यात आली. यासाठी प्रीशा फर्टिलीटी सेंटर तसेच महाराष्ट्र आयुर्वेद संमेलन, वात्सल्य हॉस्पिटल यांनी संयुक्त विद्यमाने या कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले.**



### शिबीरात यांचे लाभले उत्तम मार्गदर्शन...

**या कार्यशाळेत प्रत्येक मुद्द्यावर प्रत्येक वंध्यत्वाच्या प्रकारावर आधी आधुनिक उपचार पद्धती व नंतर पारंपरिक उपचार पद्धतीचे सादरीकरण करण्यात आले. यावेळी सर्व क्षेत्रातील तज्ज्ञ मार्गदर्शकांच्या प्रश्नोत्तराचा कार्यक्रम घेण्यात आला. यामध्ये सोनोग्राफी तज्ज्ञ डॉ. योगेश चौधरी, गुप्तरोग तज्ज्ञ डॉ. दीपक माने, वंध्यत्व निवारण तज्ज्ञ डॉ. स्वाती म्हस्के, पुरुष वंध्यत्व निवारण तज्ज्ञ डॉ. सुनील म्हस्के, आयुर्वेदाचार्य डॉ. विद्या देवरे, डॉ. रत्नप्रभा चौधरी, वंध्यत्व तज्ज्ञ डॉ. श्रद्धा चौधरी, डॉ. प्रशांत सूर्यराव, आदींनी सकाळी पहिल्या सत्रात उत्तम मार्गदर्शन केले. त्यानंतर वंध्यत्व निवारण तज्ज्ञ डॉ. जीवन चौधरी, पुण्याचे प्रसिद्ध आयुर्वेदाचार्य डॉ. दिलीप गाडगीळ, प्रसिद्ध आयुर्वेदाचार्या डॉ. स्वाती मोहिते, डॉ. कल्याणी गाडे, डॉ. सुहास लंगोटे, बीजतज्ज्ञ पवन कुलकर्णी आदींनी मार्गदर्शन केले.**

### यांचे मोलाचे सहकार्य लाभले...

**या कार्यशाळेसाठी पुणे, पिंपरी-चिंचवड, नाशिक, धाराशिव, छत्रपती संभाजीनगर येथून सुमारे दीडशे जणांनी वंध्यत्व निवारण कार्यशाळेत सहभाग नोंदविला. या कार्यशाळेच्या नियोजनात डॉ. रोहिदास अल्हाट, डॉ. संदीप कवडे, डॉ. शंकर गोरे, डॉ. अर्चना गोरे, डॉ. प्रियांका विधाते, डॉ. अविनाश देवरे, डॉ. विपुल जैस्वाल, डॉ. स्वप्नील शिंदे, तसेच डॉ. महेश शेटे यांचे मोलाचे सहकार्य लाभले. कार्यक्रमाची प्रस्तावना डॉ. रोहिदास अल्हाट, तर सूत्रसंचालन डॉ. अर्चना गोरे यांनी केले. या कार्यशाळेमुळे उपस्थित डॉक्टरांचे ज्ञानवर्धन झाले. अशा प्रकारच्या कार्यशाळा ठिकठिकाणी आणखी आयोजित व्हायला हव्यात, अशी इच्छा उपस्थितांकडून व्यक्त करण्यात आल्या. सर्वांना प्रशस्तीपत्रक देऊन डॉ. महेश यांनी आभार मानले. प्रीशा फर्टिलीटी सेंटर व महाराष्ट्र आयुर्वेद संमेलन यांनी अशा अनेक कार्यशाळा आयोजित करण्याचा यावेळी संकल्प सोडला.**

# ढग पांगले पांगले, हाक पावसाला द्या रे, दु:ख पेटले भुईचे, कुणी विझवाया या रे...



भूमिका
निलेश दुटाळ
+91-87668 40811

**आज जून महिना संपत आला तरी बळीराजाला पावसाची प्रतीक्षा करावी लागत आहे पावसाचा लपंडावाचा खेळ चालू आहे रोज आभाळ भरून येत आहे पण माहित नाही कुठे हवेत विरून जात आहे. माऊलींची पालखी आळंदी मधून निघून आज बारा दिवस झाले तरी पालखीच्या आगमनाला पावसाने आजपर्यंत हजेरी लावली नाही...**

माऊलींची पालखी आज सोलापूर मधील नातेपुते गावी पोहोचली तरी पावसाने हजेरी लावलेली नाही यापूर्वी जून महिन्या अगोदर मान्सूनपूर्व पावसाची सुरुवात झालेली असायची पेरणीपूर्व शेतीची मशागतीची कामे केली जात होती जून ते सप्टेंबर या चार महिन्यात पाऊस सुरू असायचा परंतु दिवसेंदिवस यामध्ये बदल होऊ लागला आहे त्याला प्रमुख कारण आपणच आहोत शहरीकरणासाठी विकासासाठी मोठ्या प्रमाणात वृक्षतोड केली जाते तसेच वाढते प्रदूषण शहरीकरण यामुळे वातावरणात बदल होत आहे बहुतांश ठिकाणी वनवे पेटवले जात आहेत त्यामुळे देखील वातावरणात बदल होत आहे दिवसेंदिवस पाणीटंचाईला संपूर्ण देशाला सामोरे जावे लागत आहे.



शासनाकडून मोठमोठ्या धरणाचे प्रकल्प बांधून ग्रामीण तसेच शहरी भागाला सिंचन अथवा पाणीपुरवठा केला जातो त्यासाठी प्रचंड खर्च येत असल्याने असे प्रकल्प राबवण्यात सरकारला अडचणी येतात किंवा त्याच्याकडे दुर्लक्ष केले जाते.देशाच्या अनेक भागात आजही मोठ्या प्रमाणात पाऊस पडतो पण पावसाचे पाणी अडवले जात नाही मोठ्या प्रमाणात प्रवाहने वाहून जाणारे पाणी जास्तीत जास्त गावाच्या शिवारात अडवून ठेवले तर भूगर्भातील पाण्याच्या पातळीत वाढ होईल. भावी पिढीसाठी धन संचय करण्यापेक्षा जलसंचय करण्याचे उद्दिष्ट ठेवायला हवे.

नाही गेली वेळ अजून तू जागा हो मानवा!
माहित नाही पाणी मिळेल का परवा!

महाराष्ट्र राज्याचे 50 टक्के क्षेत्र जर सिंचनाखाली आणावयाचे असेल तर विकेंद्रीत तजलसाठे निर्माण करावे लागतील महाराष्ट्र राज्यात लहान मोठी तुटलेली तलाव आहेत त्यांची दुरुस्ती करावी लागेल त्याचप्रमाणे काही तलाव गाळाने भरलेले आहेत त्यातील गाळ काढून तलावांची खोली वाढवावी लागेल त्याचप्रमाणे नवीन तलाव काढावे लागतील डोंगर भागात जागोजागी चर काढावे लागतील तसेच पाणलोट क्षेत्रात छोटी झाडे गवत लावावे लागेल त्यामुळे पावसाचे वाहून जाणारे पाणी अडवले जाईल वृक्ष लागवड करण्यासाठी सामाजिक वनीकरण योजना विभागाच्या वतीने वनीकरण केले जाते तसेच राष्ट्रीय वनीकरण कार्यक्रम यासाठी अर्थ साहाय्य करत असते शासन जलमुक्त शिवार योजना राबवित आहे त्या अंतर्गत शासनाकडून व्यक्ती तसेच स्वयंसेवी संस्थाना रोपे पुरवण्याचे काम केले जाते अशा योजनांचा लाभ घेऊन ग्रामीण भागातील लोकांनी सहकार्य करून आपल्या भागात वृक्ष लागवड करून स्वतः तसेच समाजासाठी सामाजिक कार्य करण्याची गरज आहे

पृथ्वीच्या पृष्ठभागाच्या 70 टक्के भाग पाण्याने व्यापला आहे तरीसुद्धा त्यातील फक्त अडीच टक्केच गोडे पाणी उपलब्ध आहे पृथ्वीवर गोडे पाण्याचे साठे फारच कमी आहे. ग्रामीण भागात जास्त प्रमाणात बोरवेल बसवल्या जातात परंतु जमिनीतील पाण्याची पातळी खाली गेल्यामुळे किंवा पाण्याचे प्रमाण कमी झाल्यामुळे अनेक बोरवेल बंद पडल्या आहेत पाण्याचा शोध घेण्यासाठी नवनवीन जागेवर बोरवेल मारल्या जातात किंवा विहिरी खोदल्या जातात परंतु आपणाला आडात नाही तर पोहऱ्यात येणार कुठून या उक्तीचा विसर पडला आहे. आपणाला डोंगर भागातील जुन्या झऱ्यांचा विसर पडला आहे डोंगर भागातील अनेक डोंगरांवर असे जुने झरे आहेत अशा झऱ्यांचा जुन्या जाणकार लोकांकडून माहिती घेऊन शोध घेतला पाहिजे त्या ठिकाणी पाणी साठवण्याची व्यवस्था केली तर अशा पाण्याचा मनुष्य तसेच पशु पक्षांना तसेच डोंगरातील वृक्षांना मोठ्या प्रमाणात फायदा होईल अशा पाण्याचे व्यवस्थित नियोजन केले तर गावापर्यंतहीअसे पाणी पोहोचू शकते यासाठी गावातील सर्वांनी प्रयत्न केले पाहिजेत त्यासाठी आतापासूनच प्रयत्न केले तर पुढच्या पिढीला पिण्यास पाणी मिळेल

त्याचप्रमाणे शेततळी बांधली व पाणी अडवल्याने तलाव विहिरी व धरणांमध्ये जास्त प्रमाणात पाणी जमा होईल तसेच जमिनीतील भूभागात पाण्याचा साठा होईल याचप्रमाणे पाणी बचत करणेही आवश्यक आहे पाण्याचा अपव्यय टाळला पाहिजे पाणी बचत ही आज काळजी गरज आहे तरच भविष्यकाळ सुखदायी होणार आहे.

## संपादकीय »

### महासत्तांचे मैत्रिपर्व

***भारत आणि अमेरिका यांचे संबंध शीतयुद्ध संपल्यानंतर गेली तीन दशके क्रमाक्रमाने सुधारत चालले आहेत. भारतातील एनडीए आणि यूपीए या दोन्ही सरकारांनी अमेरिकेशी संबंध सुधारण्यास महत्त्व दिले आहे.***

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांना सत्तेवर येऊन नऊ वर्षे झाली असली आणि या काळात त्यांनी अनेकदा अमेरिकेला भेट दिली असली तरी सध्या चालू असणारी ही त्यांची पहिली 'स्टेट व्हिजिट' आहे. एखाद्या राष्ट्रप्रमुखाच्या दौऱ्याला 'स्टेट व्हिजिट'चा दर्जा 'व्हाईट हाऊस'ने देणे ही त्या देशाला सन्मान आणि महत्त्व दिल्याची खूण आहे. भारत आणि अमेरिका यांचे संबंध शीतयुद्ध संपल्यानंतर गेली तीन दशके क्रमाक्रमाने सुधारत चालले आहेत. भारतातील एनडीए आणि यूपीए या दोन्ही सरकारांनी अमेरिकेशी संबंध सुधारण्यास महत्त्व दिले आहे. दोघांच्या संबंधांमध्ये असणारा पाकिस्तानचा कोन काळाच्या ओघात कमी महत्त्वाचा होत गेला. इतका की, या भेटीत पाकिस्तानचा प्रत्यक्ष किंवा अप्रत्यक्ष उल्लेखही झालेला नाही. ही संबंधांमधील सुधारणा ही केवळ भारताची गरज नाही. ती अमेरिकेचीही आहे.

**समाजकल्याण विभागाकडून जागतिक रँकिंग ३००च्या आत असलेल्या परदेशातील शैक्षणिक संस्था किंवा विद्यापीठांमध्ये, तर इतर मागास बहुजन कल्याण विभागातर्फे जागतिक रँकिंग २००च्या आत असलेल्या परदेशातील शैक्षणिक संस्था किंवा विद्यापीठांमध्ये पदव्युत्तर पदवी व पीएचडीला प्रवेश घेणाऱ्या विद्यार्थ्यांना ही शिष्यवृत्ती मिळते. त्यामध्येही एकसमानता हवी, असे विद्यार्थ्यांचे म्हणणे आहे.**

## मराठा विद्यार्थ्यांच्या परदेशी शिष्यवृत्ती



विविध समाजघटकांतील गुणवंत विद्यार्थ्यांचे परदेशी उच्च शिक्षणाचे स्वप्न साकार करण्यासाठी राज्य सरकारच्या विविध विभागांमार्फत दिल्या जाणाऱ्या शिष्यवृत्ती योजनेच्या नियमावलीत एकसमानता आणण्यात येणार आहे. त्यामध्ये परदेशी शिष्यवृत्तीसाठी लाभार्थ्यांची संख्या व निवडीचे निकष ठरविण्यात येणार असून, त्या आधारे राजर्षी शाहू महाराज संशोधन, प्रशिक्षण व मानव विकास संस्थेतर्फे (सारथी) प्रस्तावित परदेशी शिष्यवृत्ती योजनेचे निकष निश्चित केले जाणार आहेत. राज्य सरकारच्या उच्च व तंत्र शिक्षण विभागातर्फे खुला प्रवर्ग, समाजकल्याण विभागातर्फे अनुसूचित जाती व नवबौद्ध प्रवर्ग, इतर मागास बहुजन कल्याण विभागातर्फे विमुक्त जाती, भटक्या जमाती, इतर मागास वर्ग व विशेष मागास प्रवर्ग, आदिवासी विकास विभागातर्फे आदिवासी समाजघटकांतील विद्यार्थ्यांना परदेशातील शैक्षणिक संस्थांमध्ये पदव्युत्तर पदवी व पीएचडीचे शिक्षण घेण्यासाठी आर्थिक पाठबळ दिले जाते. त्या धर्तीवर मराठा समाजातील ५० गुणवंत विद्यार्थ्यांनाही परदेशात उच्च शिक्षणासाठी शिष्यवृत्ती देण्याचा प्रस्ताव 'सारथी'ने नियोजन विभागाकडे सादर केला आहे. या प्रस्तावाला मंजुरी देण्यापूर्वी सरकारच्या सर्व विभागांमार्फत परदेशात उच्च शिक्षणा घेण्यासाठी विद्यार्थ्यांना दिल्या जाणाऱ्या नियमावलीत एकसमानता आणण्यात येणार आहे.

'राज्य सरकारच्या विविध विभागांतर्फे त्यांच्या संशोधन व प्रशिक्षण संस्थांच्या माध्यमातून संबंधित समाजघटकांतील विद्यार्थ्यांना परदेशात उच्च शिक्षण घेण्यासाठी शिष्यवृत्ती दिली जाते. या शिष्यवृत्ती योजनांचे नियम समान करण्यासाठी नुकतीच बैठक झाली. या बैठकीत प्रत्येक विभागात परदेशी शिष्यवृत्तीचे निकष काय असावेत, लाभार्थ्यांची संख्या किती असावी यावर चर्चा करण्यात आली. त्यानुसार सर्व विभागांच्या परदेशी शिष्यवृत्ती योजनेचे नियम एकसमान करण्यात येत असून, त्याबाबतचा प्रस्ताव मुख्य सचिवांकडे सादर करण्यात आला आहे. त्याला मंजुरी मिळाल्यावर 'सारथी'च्या प्रस्तावात सुधारणा करण्यात येईल. त्यानंतर तो मंत्रिमंडळासमोर सादर केला जाणार आहे.

राज्य सरकारच्या विविध विभागांकडून परदेशातील विद्यापीठे किंवा शैक्षणिक संस्थांमध्ये उच्च शिक्षणासाठी प्रवेश मिळालेल्या विद्यार्थ्यांना शिष्यवृत्तीच्या माध्यमातून आर्थिक मदत दिली जाते. त्यासाठी परदेशी विद्यापीठे व शैक्षणिक संस्थांचे 'क्यूएस रँकिंग' तपासून त्या शिष्यवृत्तीचा लाभ दिला जातो. मात्र, या संदर्भात प्रत्येक विभागांचे निकष वेगवेगळे आहेत.

## ।। अभंगवाणी ।।



अइकाल परी ऐसें नव्हे बाई ।
न संडा या सोई भ्रताराची ॥१॥
नव्हे आराणुक लौकिकापासून ।
आपुल्या आपण गोविलें तें ॥२॥
- संत तुकाराम

**महाईन्यूज** हे डिजिटल वृत्तपत्र **संस्थापक संपादक अधिकराव दिवे- पाटील** यांनी विशाल थिएटर, पिंपरीच्या बाजूला **'महाईन्यूज'**च्या पुणे विभागीय कार्यालयामधून प्रकाशित केले आहे. या वृत्तपत्रात डिजिटल स्वरुपात मुद्रीत केलेले लेख, बातम्या तसेच लेखनाशी किंवा विचारांशी संस्थापक संपादक सहमत असतीलच असे नाही. **कार्यकारी संपादक : *वैष्णव जाधव.** (*सर्व बातम्यांची, लेखांची व लेखनाची जबाबदारी यांची राहील) एमएसएमई क्रमांक : MH-26-0158827. (विशेष सूचना: हा अंक प्रिंटसाठी नाही. गैरवापर केल्यास कायदेशीर कारवाई केली जाईल.)

# पुढील आठवडा पावसाचा!

## गुड न्यूज: आयएमडीकडून ॲलर्ट जारी, विदर्भात मान्सून सक्रीय

। मुंबई । महाईन्यूज । प्रतिनिधी।

**भारतीय हवामान विभागानं महाराष्ट्रातील विदर्भामध्ये मान्सून सक्रीय झाल्याचं जाहीर केलं आहे. मान्सून येत्या तीन ते चार दिवसांत महाराष्ट्रातील आणखी भागांमध्ये सक्रीय होण्याची शक्यता आहे.**



येत्या सोमवार आणि मंगळवारी मुंबईत तुरळक ठिकाणी मुसळधार पाऊस पडण्याची शक्यता शुक्रवारी प्रादेशिक हवामान विभागाने वर्तवली. येत्या तीन ते चार दिवसांमध्ये महाराष्ट्राच्या आणखी काही भागांमध्येही मान्सूनची प्रगती होईल, असा अंदाज आहे. २३ जून रोजी विदर्भाच्या काही भागांमध्ये मान्सून दाखल झाल्याचेही भारतीय हवामान विभागाने स्पष्ट केले.

सध्या कोकण किनारपट्टीवर सातत्यपूर्ण पश्चिमी वाऱ्यांमुळे तापमान वाढले आहे. रात्री जमिनीकडून समुद्राकडे वाऱ्यांचा प्रवास होणे अपेक्षित असते; मात्र तसे न होता रात्रीही समुद्रावरूनच वारे येत असल्याने कमाल तापमानाचा पारा सरासरीपेक्षा चढा आहे. प्रादेशिक हवामान विभागाने दिलेल्या जिल्हावार पूर्वानुमानामध्ये मुंबईत सोमवार आणि मंगळवारी यलो ॲलर्ट देण्यात आला आहे. या दोन्ही दिवशी मुंबई व ठाण्यात तुरळक ठिकाणी मुसळधार पावसाची शक्यता आहे. पालघर जिल्ह्यासाठीही मंगळवारी यलो ॲलर्ट आहे. रायगड, रत्नागिरीमध्ये आज, शनिवारपासून मंगळवारपर्यंत तुरळक ठिकाणी मुसळधार पावसाची शक्यता आहे. तर सिंधुदुर्गातही सोमवारपर्यंत तुरळक ठिकाणी मुसळधार पावसाचा अंदाज आहे.

सध्या मान्सूनची बंगालच्या उपसागरातील शाखा सक्रिय आहे. तर येत्या तीन ते चार दिवसांमध्ये अरबी समुद्रातील शाखाही पुन्हा सक्रिय होऊन तेलंगण, कर्नाटक आणि महाराष्ट्राच्या काही भागांमध्ये मान्सूनचा प्रवास पुन्हा सुरू होण्यासाठी अनुकूल परिस्थिती असल्याचे भारतीय हवामान विभागाने स्पष्ट केले आहे. तर विदर्भाच्या काही भागांमध्ये २३ जून रोजी मान्सून दाखल झाला. बंगालच्या उपसागरातील मान्सून शाखा सक्रिय असून, महाराष्ट्रातील अरबी समुद्राच्या शाखेचा सुरू झालेला प्रवास पुन्हा सक्रिय होण्याआधी मान्सून विदर्भात प्रवेश करेल, असा अंदाज वर्तवला जात होता. हा अंदाज शुक्रवारी भारतीय हवामान विभागाने मान्सून विदर्भात दाखल झाल्याचे जाहीर करून खरा असल्याचे स्पष्ट केले.

### रिमझिम पावसाची हजेरी

मुंबईत शुक्रवारी कुलाबा येथे ३४.६ तर सांताक्रूझ येथे ३४.४ अंश सेल्सिअस कमाल तापमान होते. सकाळी रिमझिम पाऊस पडला; मात्र त्याची नोंद शून्य मिलीमीटर झाली. मुंबई आणि ठाण्यात अनेक ठिकाणी पाच मिलिमीटरपर्यंत पावसाची नोंद झाली. तर एम पूर्व, एफ उत्तर येथे

## "नागपूरचे भाजपा नेते मोदींविरोधात बोलायचे; काँग्रेस नेते नाना पटोले यांची टीका

। मुंबई । महाईन्यूज

काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष नाना पटोले हे सातत्याने केंद्रातलं मोदी सरकार आणि राज्यातल्या शिंदे-फडणवीस सरकारला लक्ष्य करत आहेत. महाराष्ट्राचे उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी नुकताच पंतप्रधान नरेंद्र मोदींचा देशभक्त असा उल्लेख केला होता. त्यावर आता नाना पटोले यांनी प्रतिक्रिया दिली आहे. त्यांनी यावरुन फडणवीसांना प्रश्न विचारले आहेत. तसेच नागपूरमधील एका बड्या नेत्याला टोला लगावला आहे. नाना पटोले म्हणाले हा भाजपावाले देश विकणाऱ्यांना देशप्रेमी म्हणत असतील, देवेंद्र फडणवीसही त्यांना देशप्रेमी म्हणत असतील तर त्यांनी देशप्रेमीची व्याख्या काय आहे ते सांगावं.

नाना पटोले म्हणाले, देशातली किती संपत्ती त्यांनी (मोदी सरकार) विकली ते त्यांनी जाहीर करावं.



किंवा त्याचा एखादा लेख अथवा यादी जाहीर करावी. त्यांच्याकडे यादी नसेल कारण दिल्लीत काय चाललंय हे त्यांना माहिती नसेल. मोदी सरकारविरोधात राज्यातला कोणताही नेता बोलू शकत नाही. नागपूरचे काही नेते बोलत होते, परंतु तेही आता चूप झाले आहेत. तेही बोलू शकत नाहीत. नाना पटोलेंच्या बोलण्याचा रोख केंद्रीय रस्ते वाहतूक आणि महामार्ग मंत्री नितीन गडकरींकडे होता असं बोललं जात आहे. काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष म्हणाले, या सरकारने देशाची किती संपत्ती विकली हे त्यांना माहिती नसेल तर आम्ही ती थोड्याच दिवसात जाहीर करणार आहोत.

## मुंबईकरांचा प्रवास होणार गारेगार !

### आता बेस्टच्या ताफ्यात या नवीन आठ बसेस दाखल

। मुंबई । वृत्तसंस्था : महाईन्यूज

**आकर्षक आणि आरामदायी अशा आणखी आठ एसी डबलडेकर बस चालवण्याचा निर्णय बेस्ट उपक्रमाने घेतला आहे. या बस पुढील आठवड्यापासून दक्षिण मुंबईत विविध मार्गांवर चालवण्यात येणार आहेत. त्यामुळे डबलडेकर बसची एकूण संख्या बारा होणार आहे.**

आकर्षक आणि आरामदायी अशा आणखी आठ एसी डबलडेकर बस चालवण्याचा निर्णय बेस्ट उपक्रमाने घेतला आहे. या बस पुढील आठवड्यापासून दक्षिण मुंबईत विविध मार्गांवर चालवण्यात येणार आहेत. त्यामुळे डबलडेकर बसची एकूण संख्या बारा होणार आहे. पहिल्या डबलडेकर एसी बसला ऑगस्ट, २०२२मध्ये मुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि केंद्रीय रस्ते वाहतूक महामार्गमंत्री नितीन गडकरी यांच्या हस्ते हिरवा झेंडा दाखवण्यात आला होता. सप्टेंबर, २०२२, त्यानंतर ऑक्टोबर आणि नंतर १४ जानेवारीच्या मुहूर्तावर या बस प्रवाशांच्या सेवेत येणार होत्या. मात्र डबलडेकर बसच्या चाचणीचे प्रमाणपत्र प्राप्त होण्यास विलंब झाल्याने त्यांचे आगमन लांबणीवर पडले. २१ फेब्रुवारीपासून ही बस दक्षिण मुंबईत धावू लागली. सुरुवातीला अशा दोन इलेक्ट्रिक डबलडेकर एसी बस ताफ्यात होत्या. त्यानंतर आणखी दोन बस सेवेत आल्या आणि दक्षिण मुंबईत धावणाऱ्या बसची संख्या चार झाली.

गुड न्यूज, पुढील आठवडा पावसाचा असणार, आयएमडीकडून ॲलर्ट जारी, विदर्भात मान्सून सक्रीय

एकूण ९०० डबलडेकर बस मुंबईत चालवण्याचा निर्णय बेस्ट उपक्रमाने घेतला आहे. त्यापैकी फेब्रुवारी अखेरपर्यंत आणखी चार ते पाच डबलडेकर आणि मार्चपर्यंत एकूण ५० डबलडेकर बस धावणार होत्या. मात्र यास विलंब झाला आहे. डबलडेकर बसमध्ये आसनक्षमता ६६ असून, उभ्याने दहा प्रवासी प्रवास करू शकतात. सीसीटीव्ही कॅमेरे, बसमधील दोन वाहकांना परस्पर संपर्कासाठी विशेष व्यवस्था, बसच्या दोन्ही बाजूंना स्वयंचलित दरवाजे असून, ८० मिनिटांत बसचे चार्जिंग होते. सध्या बेस्ट उपक्रमाच्या सेवेत ३३ साध्या डबलडेकर बसही असून, त्या येत्या ऑक्टोबरपर्यंत कालबाह्य होणार आहेत. १५ ते १६ वर्षांपूर्वी बेस्टकडे ९०१ डबलडेकर बस होत्या. बसचे पंधरा वर्षांचे आयुर्मान, तांत्रिक समस्या इत्यादी कारणांमुळे याची संख्या हळूहळू कमी होऊ लागली. सन २०२२-२३मध्ये ४५ डबलडेकर बस होत्या. आता हीच संख्या ३३ असल्याची माहिती वरिष्ठ अधिकाऱ्याने दिली.



# लाईट्स...कॅमेरा... ॲक्शन; सिद्धार्थ जाधवने केली नव्या सिनेमाची घोषणा

अभिनेता सिद्धार्थ जाधवच्या चाहत्यांसाठी एक आनंदाची बातमी आहे. 'सर्कस' (CIRCUS) सिनेमानंतर सिद्धार्थ आता एका नव्या सिनेमाच्या माध्यमातून प्रेक्षकांच्या भेटीला येणार आहे. 'आपल्या सिद्धू'ने आज सोशल मीडियाच्या माध्यमातून नव्या सिनेमाची घोषणा केली आहे.

'सर्कस' सिनेमानंतर सिद्धार्थ आता 'थ्री चिअर्स' (THREE CHEERS) या सिनेमाच्या माध्यमातून प्रेक्षकांच्या भेटीला येणार आहे. सिद्धार्थने या सिनेमाच्या शूटिंगला सुरुवात केली आहे. त्याने "थ्री चिअर्स'...नवा दिवस, नवी भूमिका, नवा सिनेमा", असं म्हणत नव्या सिनेमाची घोषणा केली आहे.

सिद्धार्थने नव्या सिनेमाची घोषणा केल्यानंतर सेलिब्रिटींसह चाहत्यांनी अभिनंदनाचा वर्षाव केला आहे. सिद्धार्थच्या पोस्टवर अभिनंदन भावा, भावड्या तुझा विषय हार्ड आहे, 'थ्री चिअर्स' सुपरहिट होणार, नव्या सिनेमासाठी खूप खूप शुभेच्छा, अशा कमेंट्स चाहत्यांनी केल्या आहेत.



सिद्धार्थच्या आगामी 'थ्री चिअर्स' या सिनेमाच्या दिग्दर्शनाची धुरा पारितोष पेंटर (PARITOSH PAINTER) सांभाळणार आहेत. तसेच या सिनेमात विजय पाटकर (VIJAY PATKAR), जॉनी लिव्हर (JOHNNY LEVER), श्वेता गुलाटी हे कलाकार महत्त्वाच्या भूमिकेत असणार आहेत. गेल्या काही दिवसांपूर्वी या सिनेमाची घोषणा करण्यात आली असून लवकरच हा सिनेमा प्रेक्षकांच्या भेटीला येणार आहे. या सिनेमात सिद्धार्थची नेमकी भूमिका काय असेल हे अद्याप गुलदस्त्यात आहे. सिद्धार्थचा मोठा चाहतावर्ग असून त्याच्या प्रत्येक प्रोजेक्टची चाहते आतुरतेने वाट पाहत असतात.

सिद्धार्थ नुकताच 'सर्कस' या सिनेमात बॉलिवूड अभिनेता रणवीर सिंहसोबत झळकला होता. तसेच 'बालभारती' हा मराठी सिनेमा गेल्या काही दिवसांपूर्वी प्रेक्षकांच्या भेटीला आला होता. सध्या तो 'आता होऊ दे धिंगाणा' या कार्यक्रमाच्या माध्यमातून प्रेक्षकांच्या भेटीला येत आहे. आता त्याच्या चाहत्यांना 'थ्री चिअर्स' या सिनेमाची उत्सुकता आहे.

# किरण मानेंची मुलगी दिग्दर्शनात.. बापानेच शेयर केला लेकीचा पोस्टर



बिग बॉस मराठी ४ मध्ये टॉप ५ पर्यंत मजल मारणारे अभिनेते किरण माने यांनी त्यांचा जबरदस्त खेळ दाखवला. माने यांनी बिग बॉस मराठी ४ मध्ये साताराचा बच्चन अशी स्वतःची ओळख सांगितली. किरण मानेंची मुलगी आता वडिलांच्या पावलावर पाऊल टाकत दिग्दर्शनात उतरत आहे. किरण माने यांनी सोशल मीडियावर लेकीच्या नाटकाचा पोस्टर शेयर केलाय.

किरण माने यांनी सोशल मीडियावर ईशाच्या नाटकाचा पोस्टर आणि तिच्यासोबतचा फोटो शेयर केलाय. फोटो शेयर करत माने लिहितात.. ..."आपलं लेकरू नकळत आपल्या पावलावर पाऊल ठेवतं तवा मन किती भरून येतं ते शब्दांत नाय सांगू शकत. माझी मुलगी ईशा हिनं लिहीलेल्या आणि दिग्दर्शित केलेल्या 'पारंबी' या संहितेचा पहीला प्रयोग सादर होतोय. उद्या, रविवार २२ जानेवारीला संध्याकाळी ६ वाजता नामदेव सभागृह, ललित कला केंद्र, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ, पुणे येथे. मी येतोय. तुम्हीही जमलं तर नक्की या. नाट्यक्षेत्रात पहिलं पाऊल ठेवू पहाणाऱ्या माझ्या गुंड्याला भरभरून शुभेच्छा द्या !"किरण माने बिग बॉस मराठी ४ मध्ये सहभागी होते. वयाच्या ५२ व्या वर्षी त्यांनी तडफदार खेळ करत फायनल पर्यंत मजल मारली. किरण माने टॉप ३ स्पर्धक होते.


# 'द केरला स्टोरी' फेम अदा शर्माला येते 'ही' मराठी शिवी

सुदीप्तो सेन दिग्दर्शक असलेला 'द केरला स्टोरी' हा चित्रपट काही दिवसांपूर्वी प्रदर्शित झाला. या चित्रपटात अभिनेत्री अदा शर्मा हिने प्रमुख भूमिका साकारली आहे. या भूमिकेमुळे तिला नवी ओळख मिळाली. तिच्या कामाबरोबरच ती तिच्या वैयक्तिक आयुष्यामुळे अनेकदा चर्चेत असते. अनेकदा तिला प्रेक्षकांनी मराठी कविता म्हणतानाही ऐकलं आहे. आता तिला मराठी शिवीही येते असा खुलासा तिने केला आहे.



अदा शर्माला उत्तम मराठी बोलता येतं. तिने तिच्या इन्स्टाग्राम अकाउंटवर मराठी कविता म्हणतानाचे काही व्हिडीओही शेअर केले होते. तिचे हे व्हिडीओ नेटकऱ्यांना चांगलेच आवडले. याचबरोबर तिचे अनेक मराठी मित्र मैत्रिणीही आहेत. इतकंच नाही तर तिला मराठी शिव्याही कळतात. ती म्हणाली, "मी शिवी देत नाही. पण मला मराठीतील एक शिवी माहित आहे आणि ती म्हणजे बावळट. मी आतापर्यंत हा शब्द कधी कोणाला उल्लेखून वापरलेला नाही. पण तो माझ्या शब्दसंग्रहात आहे. त्यामुळे मी तो लक्षात ठेवेन आणि माझ्या आयुष्यात अनेक बावळट आहेत त्यांच्याशी मी ही मुलाखत झाल्यावर नक्कीच बोलेन." अदा शर्माचं हे बोलणं आता चांगला चर्चेत आलं आहे. दरम्यान, तिच्या 'द केरला स्टोरी' या चित्रपटाने चांगली कामगिरी केली. या चित्रपटाचे प्रेक्षकांनी भरभरून कौतुक केलं. तर या चित्रपटाने चांगली कमाई ही केली.

# दीपिका पदुकोण-रणवीरच्या मुंबईतील 119 कोटींच्या नव्या घराची पहिली झलक समोर



बॉलिवूडची लोकप्रिय सुपरस्टार जोडी दीपिका पदुकोण आणि रणवीर सिंह हे दोघे चित्रपटांबरोबरच त्यांच्या पर्सनल लाईफमुळेही चर्चेत असतात. ऑनस्क्रीन दीपिका आणि रणवीरची जबरदस्त केमिस्ट्री पाहायला मिळते, तसेच ऑफस्क्रीनही त्यांचं छान बाँडिंग आहे. अलीकडेच या क्यूट जोडीने मुंबईत ११९ कोटींचे अलिशान घर खरेदी केले आहे. हे दीप-वीरचे 'ड्रिम हाऊस' असल्याचे म्हटले जात आहे. आता या 'ड्रीम हाऊस'चा पहिला व्हिडीओ समोर आला आहे.

'विरल भयानी' या इन्स्टाग्राम अकाऊंटवर दीपिका-रणवीरच्या 'ड्रीम हाऊस'चा व्हिडीओ शेअर करण्यात आला आहे. या व्हिडीओमध्ये दीपिका-रणवीरचे 'ड्रीम हाऊस' तुम्ही पाहू शकता. सध्या या अलिशान घरामध्ये दीपिका आणि रणवीर राहत नसून इमारतीचे अद्याप काम सुरू आहे.

# विंडीज दौऱ्यासाठी भारताची टीम जाहीर!

## दिग्गजांना विश्रांती : 12 जुलैपासून उभय संघांमध्ये दोन कसोटी सामन्यांची मालिका

| तैपई |

महाईन्यूज | वृत्तसंस्था |



**भारतीय क्रिकेट संघ आता वेस्ट इंडिज दौऱ्यावर (कॅरेबियन बेटं) जाणार आहे. येत्या १२ जुलैपासून उभय संघांमध्ये दोन कसोटी सामन्यांची मालिका खेळवली जाईल. त्यापाठोपाठ तीन एकदिवसीय सामन्यांची मालिका आणि ५ टी-२० सामन्यांची मालिका खेळवली जाणार आहे. यापैकी कसोटी आणि एकदिवसीय क्रिकेट मालिकांसाठी बीसीसीआयने भारतीय संघांची घोषणा केली आहे. एकदिवसीय आणि कसोटी या दोन्ही मालिकांमध्ये रोहित शर्माच भारतीय संघाचं नेतृत्व करणार आहे. कसोटीत अजिंक्य रहाणे उपकर्णधार असेल तर एकदिवसीय मालिकेत हार्दिक पांड्याकडे ही जबाबदारी असेल.**

भारतीय क्रिकेट निवड समितीने दोन्ही मालिकांसाठी संतुलित संघांची निवड केली आहे. या संघांमध्ये अनुभवी आणि युवा खेळाडूंना संधी देण्यात आली आहे. तर तीन दिग्गजांना विश्रांती दिली आहे. कसोटी संघातून चेतेश्वर पुजारा, उमेश यादव आणि मोहम्मद शमीला विश्रांती दिली आहे. तर ऋतुराज गायकवाड, मुकेश कुमार, जयदेव उनादकट, नवदीप सैनी आणि इशान किशनला १६ सदस्यीय संघात संधी देण्यात आली आहे.

### भारताचा कसोटी संघ

» रोहित शर्मा (कर्णधार), शुभमन गिल, ऋतुराज गायकवाड, विराट कोहली, यशस्वी जयस्वाल, अजिंक्य रहाणे (उपकर्णधार), केएस भरत (यष्टीरक्षक), इशान किशन (यष्टीरक्षक), रवीचंद्रन अश्विन, रवींद्र जडेजा, शार्दुल ठाकूर, अक्षर पटेल, मोहम्मद सिराज, मुकेश कुमार, जयदेव उनादकट, नवदीप सैनी.

### भारताचा एकदिवसीय संघ

»रोहित शर्मा (कर्णधार), शुभमन गिल, ऋतुराज गायकवाड, विराट कोहली, सूर्यकुमार यादव, संजू सॅमसन (यष्टीरक्षक), इशान किशन (यष्टीरक्षक), हार्दिक पंड्या (उपकर्णधार), शार्दुल ठाकूर, रवींद्र जडेजा, अक्षर पटेल, युजवेंद्र चहल. कुलदीप यादव, जयदेव उनादकट, मोहम्मद सिराज, उमरान मलिक, मुकेश कुमार.

# शेन वॉर्नच्या मृत्यूचं धक्कादायक कारण समोर

| नवी दिल्ली |

महाईन्यूज | वृत्तसंस्था |

**आशियाई क्रिकेट परिषदेकडून आशिया कप २०२३ साठी पाकिस्तानने हायब्रिड मॉडेलचा प्रस्ताव स्विकारल्यानंतर या स्पर्धेच्या तारखा जाहीर झाल्या होत्या. आशिया कपच्या तारखांची घोषणा झाल्यानंतर आता काही दिवसांनी पाकिस्तान क्रिकेट बोर्डाने यू-टर्न घेतला आहे.**



ऑस्ट्रेलियाचा माजी लेगस्पिनर शेन वॉर्नचा मृत्यू पुन्हा एकदा चर्चेत आला आहे. शेन वॉर्नचा मृत्यू हा हृदयविकाराच्या तीव्र झटक्याने झाला होता. वॉर्नने वयाच्या ५२ व्या वर्षी जगाचा निरोप घेतला होता. पण आता त्याच्या मृत्यू नेमका कशामुळे झाला यामागचे मोठे कारण आता समोर येत आहे. वॉर्नच्या मृत्यूशी संबंधित एक धक्कादायक अहवाल समोर आला आहे.

शेन वॉर्नच्या या अहवालात त्याच्या मृत्यूचे कारण कोरोनाची लस असू शकते, असा दावा डॉक्टरांनी केला आहे. खरेतर, ऑस्ट्रेलियाचा माजी फिरकीपटू शेन वॉर्नला दिलेली कोविड लस हृदयाशी संबंधित आजार वाढवते, असे अहवालात समोर आले आहे. शेन वॉर्नला थायलंडमध्ये हृदयविकाराचा झटका आला होता. मृत्यूच्या सुमारे ९ महिने आधी त्यांना कोरोनाची लस मिळाली होती. वॉर्नला मिळालेली कोरोना लस हृदयाशी संबंधित आजार वाढवते, असे या अहवालात समोर आले आहे. एक ऑस्ट्रेलियन डॉक्टर आणि भारतीय वंशाच्या ब्रिटिश कार्डिओलॉजिस्टने शेन वॉर्नच्या मृत्यूचे कारण कोरोनाची लस असू शकते असे म्हटले आहे. वॉर्नला कोविड एमआरएनए लस (MRNA VACCINE) दिली होती, त्यामुळे हृदयविकाराचा झटका येण्याची शक्यता आहे. वॉर्नला त्याच्या मृत्यूच्या सुमारे ९ महिने आधी ही लस लास देण्यात आली होती. हृदयरोगतज्ज्ञ डॉ. असीम मल्होत्रा आणि डॉ. ख्रिस नील यांनी सांगितले की, कोविड MRNA लसीमुळे कोरोनरी रोगाचा झपाट्याने प्रसार होऊ शकतो. विशेषत: ज्यांना आधीच हृदयसंबंधित आजार आहे.

डॉक्टर मल्होत्रा म्हणाले, "माजी ऑस्ट्रेलियन खेळाडू शेन वॉर्नला वयाच्या ५२व्या वर्षी अचानक हृदयविकाराचा झटका आला, ज्यामुळे त्याचा मृत्यू झाला. मात्र, सर्वांना माहित आहे की वॉर्नची जीवनशैली फारशी आरोग्यदायी नव्हती.

# यशस्वी जैस्वालला भारतीय संघात मिळाली मोठी जबाबदारी,

| नवी दिल्ली |

महाईन्यूज | वृत्तसंस्था |

**जैस्वालला आता फक्त भारतीय संघात फक्त संधी मिळाली नाही तर त्याला एक मोठी जबादारीही मिळाली आहे. यशस्वी आता भारतीय संघात कोणत्या मोठ्या भूमिकेत दिसू शकतो.मुंबईकर यशस्वी जैस्वालला आता भारतीय संघात स्थान देण्यात मिळाले आहे. पण यावेळी त्याच्याकडे अजून एक महत्वाची जबाबदारी सोपवण्यात आल्याचे समोर आले आहे.**



या भारताच्या संघात काही नवीन चेहऱ्यांवना संधी देण्यात आली आहे तर चेतेश्वर पुजारा आणि मोहम्मद शमी या दोन अनुभवी खेळाडूंना वगळण्यात आले आहे. पण ज्या युवा खेळाडूंना संघात स्थान देण्यात आले आहे, त्यांच्याकडे आता महत्वाची जबाबदारीही सोपवण्यात आली आहे. यामध्ये यशस्वी जैस्वालसारख्या युवा खेळाडूकडे एक मोठा जबाबदारी सोपवण्यात आली आहे.

यशस्वीने आयपीएलमध्ये दमदार कामगिरी केली होती. त्यामुळे त्याला भारतीय संघात संधी देण्यात आली, असे म्हटले जात आहे. पण यशस्वीने मुंबईकडून खेळताना स्थानिक क्रिकेटमध्ये चांगली कामगिरी केली होती. त्यामुळे यशस्वी हा फक्त मोठी फटकेबाजी करत नाही तर त्याच्याकडे चांगला बचावही आहे आणि कसोटी क्रिकेटमध्ये या गोष्टीची सर्वात जास्त गरज असते. आता भारतीय संघात चेतेश्वर पुजाराला संधी देण्यात आलेली नाही.त्यामुळे त्याच्या जागी आता तिसऱ्या स्थानावर यशस्वीला संधी मिळू शकते. यशस्वीची सर्वात महत्वाची गोष्ट म्हणजे तो डावखुरा फलंदाज आहे. भारतीय संघात डावखुऱ्या फलंदाजांची कमतरता आहे. त्यामुळे तिसऱ्या स्थानावर त्याली संधी देण्यात येईल. त्यामुळे पुजाराच्या जागी संधी मिळाल्यावर यशस्वी कशी कामगिरी करतो, याकडे आता सर्वांचे लक्ष लागलेले असेल.

यशस्वीने यापूर्वी झालेल्या आयपीएलमध्ये धडाकेबाज कामगिरी केली होती. यशस्वीने तुफानी फटकेबाजी करत मोठ्या खेळी साकारल्या होत्या. त्यामुळे त्याला भारताच्या वनडे आणि कसोटी संघात स्थान देण्यात आले आहे. यशस्वीसाठी ही एक मोठी संधी असेल. कारण बऱ्याच वर्षांनी त्याला एक चांगली संधी मिळाली आहे. त्यामुळे आता वेस्ट इंडिजच्या दौऱ्यात त्याला संधी मिळेल, असे स्पष्ट दिसत आहे. पण त्याने जर कसोटी सामन्यांमध्ये चांगली कामगिरी केली तर तो भारतासाठी तिसऱ्या क्रमांकाचा फलंदाज नक्कीच बनू शकतो.